अखिल भारतीय सेवेतील, राज्यसेवेतील तसेच
सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे
अधिकारी/पदाधिकारी यांच्या परदेश दौ-यांबाबत...

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-सीडीआर-२००१ /प्र.क्र.१२/०१/अकरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३ नोव्हेंबर, २००१.

वाचा: (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/११, दि.६.४.९६,
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/११, दि.३१.१२.९६,
(३) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/११, दि.११.४.९७,

## परिपत्रक

अखिल भारतीय सेवेतील, राज्यसेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादिंचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या विदेश दौऱ्याबाबतची प्रकरणे वर नमूद केलेल्या शासन परिपत्रकान्वये तपासून शिफारस समितीसमोर सादर केली जातात. अलीकडे शिफारस समितीसमोर सादर करण्यासाठी मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त होणाऱ्या प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले आहे की, परदेश दौऱ्यावर पाठविण्यासाठी सेवानिवृत्तीस जवळ आलेल्या अधिकाऱ्यांचा देखील विभागाकडून विचार केला जातो.

२. सेवानिवृत्तीस जवळ आलेला अधिकारी प्रशिक्षणक्षम ठरेलच असे नाही. शिवाय असे अधिकारी शासकीय उत्पादकता व कार्यक्षमता वाढविण्यात योगदान देऊ शकतीलच याचीही खात्री देता येत नाही. त्यामुळे शक्यतो ज्या अधिकाऱ्यांना सेवानिवृत्त होण्यास किमान ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी उरलेला आहे अशाच अधिकाऱ्यांना दौऱ्यावर पाठविण्याबाबत विचार करण्यात यावा असे शासनाने ठरविलेले आहे.

३. सर्व मंत्रालयीन विभागानी विदेश दौऱ्याचे प्रस्ताव शिफारस समितीसमोर सादर करताना या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच त्यांनी सदर सूचना त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रम, मंडळे व महामंडळे सांविधिक संस्था तसेच शासकीय/ निमशासकीय संस्था यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व त्यांना या सूचनांचे कटाक्षाने अनुपालन करण्याबाबत कळवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भि. रा. वाढवे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,

उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
मुख्य सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन क्रमांक ८,१०,१२-अ,१९-अ
सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,
निवड नस्ती.

--------------

* पत्राने